संदर्भ:-१) या कार्यालयाचे परिपत्रक क.क्रा-५/मुद्रांक-२०१३/LBT/प्र.क्र-२२/१२/३५६/२०१३
दिनांक १७/०४/२०१३
२) या कार्यलयाचे मा. सचिव नगर विकास विभाग यांना अ.शा. पत्र
क्रमांक/मुद्रांक१३/प्र.क्र२२/१२/४८२/१ दिनांक १९/०६/२०१३
३) शासन पत्र क्रमांक मुद्रांक-२०१३/१५४८/ प्र.क्र३२१/म-१ दिनांक २८/१०/२०१३

---

क्र.का.५/मुद्रांक-१३/प्र.क्र.-२२ /१३/७५६
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - ०७ /११/२०१३.

## परिपत्रक

विषय:- विक्री, देणगी किंवा फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखाव्दारे सुरक्षित रक्कमेवर १% स्थानिक सेवाकर (LBT) लागू करण्याबाबत...

**प्रस्तावना:-**

राज्यातील मुबंई महानगर पालिका सोडून सर्व महानगर पालिकाच्या क्षेत्रातील व्यवहारावर महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४९ नुसार विक्री, देणगी किंवा फलोपगहाणाच्या संलेखावर आकारण्यात येणारा १% अधिभार आकरण्याबाबत दिनांक ०१/०४/२०१३ पासून विनिर्दिष्ट करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आपल्या विभागाकडून सुध्दा याची अंमलबजावणी दिनांक ०१/०४/२०१३ पासून सुरू करण्यात आलेली आहे. परंतु याची अंमलबजाबणी करताना विशेषत: दिनांक ०१/०४/२०१३ पूर्वी नोंदविलेल्या साठेखत/ करारनाम्याबाबत कशी कार्यवाही करावी, या अनुषंगाने या कार्यालयाचे दिनांक १७/०४/२०१३ रोजी परिपत्रक काढून स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

तसेच उक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाने शासनाकडून मार्गदर्शन अपेक्षिले असता, शासनाने या बाबत विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन या कार्यालयास खालील प्रमाणे कळविलेले आहे.

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४९अन्वये विक्री, देणगी किंवा फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या नोंदणीवर अतिरिक्त मुद्रांक शुल्क आकारावयाचे आहे. सबब, १% हे मुद्रांक शुल्क असल्याने त्याच्या आकारणीसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील सर्व तरतूदी व सुधारणा लागू आहेत.

उपरोक्त प्रमाणे दिनांक १७/०४/२०१३ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ३ बाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे. यांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

दिनांक १ एप्रिल २०१३ पूर्वी साठे करार/ करारनामा झालेला असेल त्यावर मुद्रांक शुल्क हा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुच्छेद २५ ब नुसार प्रचलित दराने पूर्ण रित्या भरून नोंदणी केलेले असतील अशा कराराच्या अनुषंगाने १/०४/२०१३ नंतर खरेदीखत किंवा हस्तांतरणाचा अंतिम दस्त करण्यात येत असल्यास त्यास मुबंई मुद्रांक अधिनियमातील अनुच्छेद २५ ब खालील स्पष्टीकरण १ मधिल परंतुक -३ प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणी करणेत यावी. (दिनांक २५/०४/२०१३ च्या सुधारणेनुसार )

वर नमूद केल्या प्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सह जिल्हा निबंधक व नोंदणी अधिकारी यांच्या निर्दशनास हे परिपत्रक तात्काळ आणून द्यावे व त्याची पोहच या कार्यालयास सादर करावी या अनुषंगाने या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी.
मा. नो.म.नि. यांनी दुरध्वनी वरून मान्य केल्याप्रमाणे

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता

प्रति,

१. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना.
२. सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
३. सर्व सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
४. सर्व नोंदणी अधिकारी.